आरोग्य सेवा.

जा.क्र.आमाजीआ/डीएचएस-८३/१२२३-१८७४
संचालनालय आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य
मुंबई-४००००१
दिनांक :- ३०/१/१९८९

प्रति,
जिल्हा दंडाधिकारी,
जिल्हा: पुणे
पिन :-

विषय :- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९च्या कलम १३]३] अन्वये उशीरा नोंदणी करण्यासाठी आदेश देण्यास कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ असल्याबाबत...

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९च्या कलम १३[३] व तदअंतर्गत महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम, १९७६च्या नियम १०[३] नुसार जन्म/मृत्यु घटना घडल्या पासुन १ वर्षापेक्षा जास्त काळ नोंदणीस उशीर झाला असल्यास अशी उशीरा नोंदणी कार्यकारी दंडाधिकारी [Executive Magistr यांच्या खास हुकुमावरुन व विलंब शुल्क रूपये ५/- घेऊन उशीरा नोंदणी करण्याची तरतुद असल्याचे या कार्यालयाचे पत्र क्रमांक एचआयव्हीएस/पीएस/डीएचएस/८१/७६२९-८६ दिनांक ३०/६/१९८१ ने आपल्या निदर्शनास आणले होते.

या संदर्भात डेप्युटी रजिस्ट्रार जनरल, भारत सरकार गृहमंत्रालय, नवी दिल्ली यांचे नव्याने मार्गदर्शक तत्वे प्राप्त झाले असुन आता जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९च्या कलम १३[३] नुसार, करण्यात येणारी कार्यवाही हे ज्या भागांतील उशीरा नोंदणी करावयाची आहे त्याच भागातील वर्ग-१ मधील पद भुषविणारे कार्यकारी दंडाधिकारी करु शकतील. ज्या कोणी तहसीलदारांना वर्ग-१ मधील कार्यकारी दंडाधिकारीचे बरोबरीचे कार्यकारी दंडाधिकारी आहे असे स्पष्टपणे घोषीत केले असल्यास असे तहसीलदार यांनी कार्यवाही करु शकतील इतर तहसीलदार कलम १३[२] ची कार्यवाही करु शकणार नाहीत. या बाबत आलेल्या स्पष्टीकरणाचे पत्र १/१४/८६-व्हीएस कार्ड दिनांक २७/१२/१९८८ ची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे. (पृष्ठ ४)

आपणांस या बाबत विनंती करण्यांत येते की, सदर नव्याने प्राप्त झालेले स्पष्टीकरण आपल्या अधिकार कक्षेतील सर्व कार्यकारी दंडाधिकारी [तहशीदार] व कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ [उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी इ.] यांच्या वैयक्तिक निर्दशनास आणण्यात यावे. व या पुढे ज्या त्या भागातील एक वर्षापेक्षा जास्त काळ उशीरा करावयाच्या नोंदणी साठी त्या भागाचे कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ यांनाच या संबंधी खास हुकुम देण्याचा अधिकार असल्याचे कळवावे. तसेच आपल्या जिल्हयातील

.... २ ....